Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 20/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## निबंधकार विष्णुशास्त्री चिपळूणकर



विष्णुशास्त्री हे 'आधुनिक मराठी गद्याचे जनक' म्हणून ओळखले जाणारे श्रेष्ठ मराठी ग्रंथकार, निबंधकार होते. त्यांचा जन्म २० मे १८५० रोजी पुणे येथे झाला. मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची परीक्षा पुण्याच्या 'डेक्कन कॉलेजा'तून ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुणे व रत्नागिरी येथील सरकारी माध्यमिक शाळांतून त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. विष्णूशास्त्री यांनी इतिहास, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र व नीतिशास्त्र या विषयांचा तसेच इंग्रजी, संस्कृत व मराठी या भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथाचा सखोल अभ्यास केला होता. त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे संस्कृततज्ज्ञ होते.

कृष्णशास्त्री यांनी चालविलेल्या शालापत्रक या मासिकातून विष्णुशास्त्रींचा लेखनाचा आरंभ झाला (१८६८) व त्यानंतर काही वर्षांतच ते या मासिकाचे संपादकही झाले. सरकारी नोकरीत असतानाच त्यांनी निबंधमाला, हे सुप्रसिद्ध मासिक काढले (१८७४). तसेच ज. बा. मोडक

काव्येतिहाससंग्रह हे मासिक सुरू केले (१८७८). निबंधमाला हे विष्णुशास्त्रींचे प्रमुख जीवितकार्य होते. निबंधमालेच्या सात वर्षांच्या कारकिर्दीत निघालेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ८४ अंकांतील लेखन विष्णुशास्त्रींनी जवळजवळ एकटाकी केले. निबंधमालेत विविध विषयांवर लिहिलेल्या त्यांच्या निबंधांनी मराठी निबंधाला सामर्थ्य दिले.

शालापत्रक, निबंधमाला, केसरी इत्यादी नियतकालिकांतून विष्णुशास्त्रींनी जे लेखन केले ते भाषा-साहित्यविषयक, सामाजिक, राजकीय असे विविध प्रकारचे आहे. त्यांच्या भाषा-साहित्यविषयक लेखांत मराठी भाषेची तत्कालीन स्थिती, भाषापद्धती, परभाषेतील शब्दांची योजना, इंग्रजी भाषा, कविता, विद्वत्व आणि कवित्व, ग्रंथांवरील टीका वगैरे विषयांवरील लेखन अंतर्भूत आहे. 'आमच्या देशाची स्थिती' आणि 'मुद्रणस्वातंत्र्य' हे दोन लेख त्यांच्या राजकीय लेखनापैकी विशेष उल्लेखनीय होत. अशा या श्रेष्ठ

Nashik Edition

May 20, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401